3 त्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास
सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज
ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664
9403448649



दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक



पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड,
पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक
पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76



● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २६७ वा ● सोमवार, ता. १७ मार्च २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



रयत समाचार पोर्टल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
RAYAT SAMACHAR
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code




## बेळगाव मनपा महापौरपदी पवार तर उपमहापौरपदी जोशी बिनविरोध

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या बेळगाव महानगर पालिकेच्या महापौर उपमहापौर पदाची निवडणूक आज शनिवारी पार पाडत आहे.दरम्यान महापौरपदी प्रभाग क्रमांक ४१ चे नगरसेवक मंगेश पवार तर प्रभाग क्रमांक ४४ च्या नगरसेविका वाणी जोशी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. महापौर आणि उपमहापौर दोन्हीही महत्त्वाचे पदे शहराच्या दक्षिण मतदार संघाला प्राप्त झाली आहेत. यावरून पुन्हा एकदा आमदार अभय पाटील यांचे महापालिकेवरील वर्चस्व सिद्ध झाले आहे.

### सर्वोच्च मुख्य न्यायाधीश पदावरुन निवृत्त झाल्यावर

## कुठल्याही पदाची लालसा करणे, त्या पदाचा थेट अपमानच– परांजपे

**नाशिक । प्रतिनिधी**



सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पद हे किती प्रचंड उंचीचे पद आहे ? देशाच्या राष्ट्रपतींना शपथ देण्याइतके ते मोठे पद आहे. त्याच्यापेक्षा कोणतेही पद अधिक मोठे नाही. त्या पदावरुन निवृत्त झाल्यावर कुठल्याही पदाची लालसा करणे, हा त्या पदाचा थेट अपमानच आहे, असे परखड मत निवृत्त न्यायाधीश



प्रकाश परांजपे यांनी मांडले. ते पुढे म्हणाले, कोठलेही पद अथवा पदवी निवृत्ती न्यायाधीश सर्वोच्च न्यायालय यापेक्षा मोठी नाही. एक न्यायाधीश निवृत्तीनंतर एका राज्याचा राज्यपाल होतो, तर एक न्यायाधीश राज्यसभेचा खासदार होतो. लाज कशी वाटत नाही, हा हपापलेपणा करायला ? असा थेट सवाल परांजपे यांनी विचारला. निवांतपणे निवृत्तीनंतरचा कालावधी घालवावा, आत्मचरित्र लिहावे. प्रसिद्धीपासून दूरच रहावे. आता तर एका निवृत्त न्यायाधीशाने गोदी मिडीयाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या एका दैनिकाने दिलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार स्विकारला आहे. कोत्या वृत्तीचे हे जाहीर प्रदर्शन, अत्यंत दुःखद आहे, अशी खंत प्रकाश परांजपे यांनी व्यक्त केली.



## ‘ऐतिहासिक वाडे व घराणी’ ग्रंथाचे छत्रपती संभाजीराजे यांच्या हस्ते प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

सुमित डेंगळे या तरुण इतिहास अभ्यासकांनी उत्तर अहमदनगर जिल्ह्यातील मराठाकालीन वाडे व घराण्यांचा अभ्यास करून लिहिलेला हा अभ्यासपूर्ण ग्रंथ मराठा वास्तुकला, जीवनपद्धती व इतिहास समजण्यास निश्चितच उपयोगी ठरणार आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीराजे यांनी केले. एस.एम. जोशी सभागृहात हा ग्रंथ प्रकाशन सोहळा काल संपन्न झाला.

कार्यक्रमास इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, डॉ. संजय तांबट, प्रा. विठ्ठल शेवाळे यांच्यासह सकाळ पब्लिकेशनचे मान्यवर व इतिहासप्रेमी उपस्थित होते.



## मारहाणीच्या निषेधार्थ पुरोगामी संघटनांचा प्रांत कार्यालयावर मोर्चा

### समविचारी संघटनांबरोबर वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

संगमनेर येथे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांना मंत्री नितेश राणे यांच्या विरोधात निवेदन देण्यास गेलेल्या छात्र भारतीच्या विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासमोर तसेच पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत त्यांच्याच कार्यकर्त्यांनी मारहाण केली. तसेच राज्यभरात वाढत असलेल्या हिंसाचाराच्या घटना, लोकशाही पद्धतीने न्याय मागत असताना होणारी मुस्कटदाबी,नेत्यांची-मंत्र्यांची बेभान वक्तव्य,समाजांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या घटना घडत आहे.

तसेच संगमनेर येथील मारहाणीच्या घटनेच्या निषेधार्थ मा.आ. कपिल पाटील, मा.आ. डॉ.सुधीर तांबे, सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे राज्य सचिव डॉ.अजित नवले, वंचितच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रूपवते,सेवा दलाचे राज्याचे अध्यक्ष राजाभाऊ कांदळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संगमनेर प्रांत कार्यालयावर समविचारी पुरोगामी संघटनांच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी डीवायएसपी सोनवणे यांना निवेदन देऊन आरोपींवर सक्त कार्यवाही व्हावी यासाठी आग्रह धरला. निषेध सभेसाठी छात्र भारतीचे राज्याचे अध्यक्ष मा.रोहित ढाले,राजाभाऊ अवसक,ॲड. रंजनाताई गवांदे,सिताराम राऊत,डॉ.सागर भालेराव,दत्ता ढगे,रजत अवसक यांच्या सह छात्रभारती संघटनेचे कार्यकर्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई इंडियन्सचा दमदार विजय

## डब्ल्यूपीएल २०२५ चे विजेतेपद पटकावले!

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

ब्रेबॉर्न स्टेडियम, मुंबई येथे पार पडलेल्या महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) २०२५ च्या अंतिम सामन्यात मुंबई इंडियन्स महिला संघाने दिल्ली कॅपिटल्सचा ८ धावांनी पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. हा सामना अत्यंत चुरशीचा झाला, मात्र हरमनप्रीत कौरच्या उत्कृष्ट अर्धशतकाने मुंबईला विजयी आनंद मिळवून दिला. दिल्ली कॅपिटल्सच्या कर्णधार मेग लॅनिंगने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीच्या वेगवान आणि फिरकी गोलंदाजांनी मुंबईला सुरुवातीपासूनच अडचणीत टाकले. सलामीवीर यास्तिका भाटिया (८) आणि हेली मॅथ्यूज (३) लवकरच बाद झाल्या, त्यामुळे मुंबईची धावसंख्या ५/२ अशी झाली. त्यानंतर नॅटली शिवर (३०) आणि हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरला. हरमनप्रीतने आपल्या नैसर्गिक शैलीत खेळ करत शानदार ६६ धावा केल्या. तिच्या या खेळीत ९ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. तिच्या साथीला नॅटली शिवर हिनेही संयमी खेळ करत ३० धावांचे योगदान दिले. अखेरच्या काही षटकांत अमनजोत कौरने ७ चेंडूत १४ धावा फटकावून संघाला १४९ धावांपर्यंत पोहोचवले.



मुंबईच्या फलंदाजांना रोखण्यात दिल्लीच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी बजावली. अनुभवी मरिझान कॅपने ४ षटकांत केवळ ११ धावा देत २ बळी घेतले, तर ॲनाबेल सुथरलँड (१/२९), जेस जोनासेन (२/२६) आणि एनआर-श्री चरनी (२/४३) यांनीही प्रभावी मारा केला. १५० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खराब झाली. कर्णधार मेग लॅनिंग (१३) आणि शफाली वर्मा (४) स्वस्तात बाद झाल्या. त्यानंतर जेस जोनासेन (१३) आणि जेमिमा रॉड्रिग्ज (३०) यांनी थोडीशी लय पकडली, पण मुंबईच्या गोलंदाजांनी सतत बळी मिळवत सामना आपल्या हातात ठेवला. दिल्लीकडून मरिझान कॅपने सर्वाधिक ४० धावा केल्या. अखेरच्या काही षटकांत निकी प्रसाद (२५) आणि मिनू मणी (४) यांनी काही फटके मारण्याचा प्रयत्न केला, पण तो अपुरा ठरला. दिल्ली संघाने निर्धारित २० षटकांत १४१/९ धावा केल्या आणि ८ धावांनी पराभव पत्करावा लागला. मुंबईच्या गोलंदाजांनी प्रभावी गोलंदाजी करत दिल्लीच्या फलंदाजांना सहज फटके मारू दिले नाहीत. नॅटली शिवरने ४ षटकांत ३० धावा देत ३ बळी घेतले आणि संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याशिवाय अमेलीया केर (२/२५), हेली मॅथ्यूज (१/३७), शबनिम इस्माइल (१/१५) आणि सायका इशाक (१/३३) यांनीही मोलाचे योगदान दिले सामनावीर : हरमनप्रीत कौर (६६ धावा, ४४ चेंडू, ९ चौकार, २ षटकार) मालिकावीर : नॅटली शिवर्रे सर्वाधिक धावा : हरमनप्रीत कौर, सर्वाधिक बळी : नॅटली शिवर, मुंबई इंडियन्सचे दुसरे विजेतेपद! मुंबई इंडियन्स महिला संघाने २०२३ मध्ये पहिल्यांदा डब्ल्यूपीएलचे विजेतेपद मिळवले होते, आणि आता २०२५ मध्येही त्यांनी विजेतेपदावर आपली मोहोर उमटवली आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली मुंबई संघाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आणि महिला क्रिकेटमध्ये आपली ताकद दाखवून दिली. मुंबईच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत महिला प्रीमियर लीगच्या इतिहासात दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवले आणि आपल्या चाहत्यांना अभिमान वाटावा असा क्षण दिला!

# कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांसाठी वरदान





**शफीक बागवान**
श्रीरामपूर
९८६०४ ००६८५
**कृषीवार्ता**

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजना राबवतात. आधुनिक शेतीला चालना देणे, उत्पादन वाढवणे, शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे आणि नैसर्गिक आपत्तींच्या वेळी संरक्षण देण्यासाठी शासनामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल व्हावेत, यासाठी जिल्ह्याचा कृषी विभाग शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करत आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-२०१९ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड बाबीचा लाभ न घेऊ शकणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देण्यात येतो. योजनेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांना पहिल्या वर्षी ५० टक्के, दुसऱ्या वर्षी ३० टक्के आणि तिसऱ्या वर्षी २० टक्के अशा तीन वर्षात योजनेचा लाभ देण्यात येतो. लाभार्थी शेतकऱ्याने दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी लागवड केलेल्या झाडांचे जीविताचे प्रमाण बागायती झाडांसाठी ९० टक्के तर कोरडवाहू झाडांसाठी ८० टक्के ठेवणे आवश्यक आहे. हे प्रमाण कमी झाल्यास शेतकऱ्याने स्वखर्चाने झाडे आणून पुन्हा जिवंत झाडांचे प्रमाण विहित केल्याप्रमाणे राखणे आवश्यक आहे. कोकण विभागासाठी कमाल १० हेक्टर तर उर्वरित महाराष्ट्रासाठी कमाल ६ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. कोकण विभाग वगळता ठिबक सिंचन संच बसवणे बंधनकारक आहे. वैयक्तिक शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ घेता येईल. शेतकऱ्यांचा स्वतः च्या नावे ७/१२ असणे आवश्यक आहे. जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल, तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी संमतीपत्र आवश्यक आहे. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबवण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक आहे. परंपरागत वननिवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ नुसार वनपट्टेधारक शेतकरी योजनेत घेण्यासाठी पात्र आहेत. लाभ घेण्यासाठी पात्र आहेत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील २० हजार ४५१ लाभार्थ्यांची महाडीबीटी प्रणालीद्वारे निवड करण्यात आली आहे. २ हजार ४३२ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली असून २ हजार २३१ लाभार्थ्यांना १ हजार ४१ हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान वितरित करण्यात आले आहे. कृषी यांत्रिकीकरण योजनाफ सन २०१४-१५ या वर्षापासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ट्रॅक्टर, पॉवर टिलर, पेरणी यंत्र,, मळणी यंत्र, कल्टीवेटर, रोटावेटर आदी प्रकारची यंत्र अवजारे शेतकऱ्यांना अनुदान तत्त्वावर उपलब्ध करुन देण्यात येतात. अनुसूचित जाती, जमाती, अल्प व अत्यल्प महिला शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर तसेच बहुभूधारक शेतकऱ्यांना ४० टक्के अनुदान योजनेंतर्गत वितरित करण्यात येते. सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षात १८ हजार २१३ शेतकऱ्यांना १० कोटी ९ लाख १४ हजार रुपये तर २०२३-२४ या वर्षात ६ कोटी ६२ लाख रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहे. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प लहान आणि सीमांत शेतकरी तसेच नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन शेतमालाच्या सर्वसमावेशक व स्पर्धात्मक मूल्य साखळी विकासाला मदत करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा, अर्थसहाय्य या प्रकल्पातून दिले जाते. प्रकल्पांतर्गत दिले जाणार आहे. जिल्ह्यातील ३३ शेतकरी उत्पादक कंपन्यांना अंतिम मान्यता देण्यात येऊन १ कोटी ४० लक्ष रुपयांचे पहिल्या टप्प्यातील अनुदानही वितरित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देणे, शेतमालाचे मूल्यवर्धन करणे आणि शेतकऱ्यांच्या सहभागाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रकल्प उभारण्यासाठी प्रोत्साहन देणे, उत्पादित अन्न पदार्थांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी तसेच उर्जेची बचत व्हावी यासाठी उद्योगांच्या आधुनिकीकरणास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात सन २०२३-२४ या वर्षात १ कोटी ५० लक्ष रुपयांच्या तीन प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे.